जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

**प्रेसनोट दिनांक - २५/१०/२०२४**

विधानसभा निवडणुक २०२४ बंदोबस्ताकरीता पुणे शहर आयुक्तालयामध्ये सीमा सुरक्षा दलाच्या आलेल्या कंपन्यांची राहाण्याची व्यवस्था, नवीन वसतीगृह, सामाजिक न्याय विभाग विश्रांतवाडी पुणे येथे करण्यात आलेली आहे.त्याअनुषंगाने पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्यावतीने पुणे शहर पोलीस व सुरक्षा दल यांच्यात समन्वय राहावा याकरीता संवाद बैठकीचे आज दिनांक २५/१०/२०२४ रोजी आयोजन करण्यात आले होते.

सदर वेळी मा.श्री.अमितेश कुमार,पोलीस आयुक्त,पुणे शहर मा.श्री.रंजन कुमार शर्मा, पोलीस सह आयुक्त,पुणे शहर तसेच मा.डॉ.सुहास दिवसे,जिल्हाधिकारी,पुणे, श्री.राजेश कुमार, कमांडंट,सीमा सुरक्षा दल, श्री.मनोजकुमार डेप्युटी कमांडंट,सीमा सुरक्षा दल, हे उपस्थित होते.

सदरवेळी त्यांच्या राहाण्याची,भोजन व्यवस्था तसेच त्यांना दिलेल्या सोईसुविधांची पहाणी केली.

संवाद बैठकी दरम्यान मा.पोलीस आयुक्त यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करुन पुणे शहराची तसेच विधानसभा निवडणुक बंदोबस्ता बाबतची माहिती दिली. तसेच मा.जिल्हाधिकारी यांनी पुणे शहरातील विधानसभा निवडणुक २०२४ मधील पुणे शहरात असणारी मतदान केंद्र,बुथ याबाबत माहिती दिली.सीमा सुरक्षा दलाचे कंपनी कमांडन्ट तसेच सुरक्षा दलातील जवान यांनी देखील त्यांचे मनोगत व्यक्त करुन पुणे शहरात बंदोस्ताकरीता येण्यासाठी आम्ही स्वतःहुन इच्छुक असतो,तसेच पुणे शहरात उत्तम प्रकारे आमची राहाण्याची,भोजन व इतर मुलभूत सोईसुविधा केल्या आहेत,वगैरे माहिती सांगुन पुणे शहर पोलीस दलाची व जिल्हा प्रशासन विभागा यांनी केलेल्या सोईसुविंधा बाबत समाधान व्यक्त केले.

वरील कार्यक्रमाचे वेळी श्री.राजु नांदकर,डेप्युटी कमिशनगर पुणे म.न.पा, श्री.मनोज पाटील, श्री.प्रविणकुमार पाटील अपर पोलीस आयुक्त पुर्व/पश्चिम विभाग, श्री.शैलेश बलकवडे अपर पोलीस आयुक्त,गुन्हे, श्री.संदीपसिंह गिल्ल,पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१, श्रीमती स्मार्तना पाटील पोलीस उप आयुक्त परिमंडळ-२, श्री.संभाजी कदम,पोलीस उप आयुक्त परिमंडळ-३, श्री.हिंमत जाधव, पोलीस उप आयुक्त परिमंडळ-४, श्री.आर.राजा,पोलीस उप आयुक्त परिमंडळ-५, श्री.राजकुमार शिंदे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय, श्री.विवेक मासाळ, पोलीस उप आयुक्त, आर्थिक व सायबर विभाग, श्री.निखील पिंगळे,पोलीस उप आयुक्त,गुन्हे, श्री.मिलिंद मोहिते,पोलीस उप आयुक्त विशेष शाखा,पुणे शहर, श्री.विठ्ठल दबडे,सहायक पोलीस आयुक्त,विशेष शाखा, श्रीमती अनुजा देशमाने,सहायक पोलीस आयुक्त,खडकी विभाग, श्रीमती प्रांजली सोनावणे,सहायक पोलीस आयुक्त,येरवडा विभाग, श्रीमती कांचन जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,विश्रांतवाडी पो.स्टे. श्री.मंगेश हांडे, पोलीस निरीक्षक गुन्हे,विश्रांतवाडी पो.स्टे.तसेच सीमा सुरक्षा दलाचे अधिकारी व जवान उपस्थित होते.


पुणे शहर पोलीस
व
सुरक्षा दल
संवाद बैठक
पुणे पोलीस


पोलीस आयुक्तालय, पुणे शहर
पुणे शहर पोलीस
व
सुरक्षा दल
संवाद बैठक
पुणे पोलीस

